महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र
७०८ सदाशिव पेठ, कुमठेकर मार्ग, पुणे ४११०३०.
Email- preserviceedudept@maa.ac.in

जा.क्र.राशैसंप्रपम/सेवापूर्व शिक्षण/प्रवेश कक्ष/२०२३-२४/ 02630 दि02 /०६/२०२३

प्रति,

प्राचार्य,

जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (सर्व)

**विषय:- डी.एल.एड. प्रथम वर्ष ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया २०२३-२४ बाबत .....**

उपरोक्त विषयाबाबत शासनाच्या दिनांक २६.०४.२०१६ च्या पत्रानुसार सन २०१६-१७ पासून डी.एल.एड. प्रथम वर्षाचे प्रवेश ऑनलाईन पद्धतीने सुरु करण्यात आलेले आहेत. शैक्षणिक वर्ष २०२३-२४ साठीची प्रवेशप्रक्रिया दि.१३/०६/२०२३ पासून सुरु होत आहे.

सदरच्या ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेबाबत खालील सूचनांचे काटेकोर पालन करून आपल्या कार्यक्षेत्रातील सर्व अध्यापक विद्यालयांना याबाबत सविस्तर सूचना द्याव्यात.

१. डी.एल.एड. प्रथम वर्ष प्रवेश प्रक्रियेबाबतची २०२३-२४ ची प्रवेश नियमावली, अध्यापक विद्यालय यादी, वेळापत्रक, प्रवेशाबाबतच्या सूचना www.maa.ac.in संकेतस्थळावरील 'Important Information' मध्ये उपलब्ध आहे.

२. दि.१३/०६/२०२३ ते दि.२८/०६/२०२३ या कालावधीत प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था /पडताळणी अधिकारी यांनी **पूर्ण भरलेल्या आवेदनपत्राची ऑनलाईन पडताळणी करावी.** पडताळणी अधिकाऱ्यांनी प्रवेश अर्जासोबत upload केलेल्या प्रमाणपत्रांच्या आधारे online पडताळणी करावयाची आहे. पडताळणी केल्याशिवाय विद्यार्थ्याचा अर्ज प्रवेश प्रक्रियेत समाविष्ट होणार नाही. यासंदर्भात विद्यार्थ्याला वेळोवेळी SMS / ई-मेल द्वारे कळविले जाणार आहे.

३. अध्यापक विद्यालयाच्या प्राचार्यांचे Login ला त्या अध्यापक विद्यालयात प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांची यादी दिसेल. प्राचार्यांनी विद्यार्थ्यांचे प्रवेशपत्र व सर्व मूळ प्रमाणपत्रे पाहूनच विद्यार्थ्यास प्रवेश द्यावयाचा आहे व online admit करून घ्यावयाचे आहे. विद्यार्थ्यांची प्रमाणपत्रे पडताळणीमध्ये त्रूटी आढळल्यास व विद्यार्थी प्रवेशास अपात्र ठरला तरच त्यांचे Login मधील Reject या बटणावर Click करावे. अन्यथा Reject या बटणाचा वापर करू नये. **शासकीय कोट्यातील विद्यार्थी प्रत्यक्ष अध्यापक विद्यालयात प्रवेशास आला नाही म्हणून त्यास Reject करू नये.**

४. अध्यापक विद्यालयाच्या प्राचार्यांनी प्रवेशित विद्यार्थ्यांना त्यांचे Login मधून विहित कालावधीत admit न केल्यास विद्यार्थी प्रवेशित झाला असे होत नाही. त्यामुळे पुढे विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहील व याची जबाबदारी संबंधित अध्यापक विद्यालयाच्या प्राचार्यांची राहील.

५. विद्यार्थ्यांचे अर्ज भरताना विद्यार्थ्यांचेच Email ID व Mobile No. देणे आवश्यक आहे. अध्यापक विद्यालयातील प्राध्यापक किंवा कर्मचा-यांचे Email ID व Mobile No. देऊ नयेत.

६. व्यवस्थापन कोट्यातून प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्याने ऑनलाईन प्रक्रियेतील अर्ज पूर्ण भरणे (Submit) बंधनकारक आहे.

७. व्यवस्थापन कोट्यातील विद्यार्थी प्रवेशास आल्यानंतर प्राचार्यांनी प्रथम त्याचा Application ID टाकून अर्ज Open करावा. सर्व मूळ प्रमाणपत्रे तपासूनच विद्यार्थ्यास online admit करून घ्यावे. विद्यार्थ्यास Online Admit न केल्यास विद्यार्थ्याचा प्रवेश ग्राह्य धरला जाणार नाही. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झाल्यास याची सर्वस्वी जबाबदारी प्राचार्य संबंधित अध्यापक विद्यालय यांची राहील.

८. प्राचार्य अध्यापक विद्यालय हे व्यवस्थापन कोट्यातील प्रवेशाचे प्रस्ताव संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालक यांना वेळापत्रकानुसार **Online Forward** करतील.

९. विहित कालावधीत व्यवस्थापन कोट्यातील प्रवेशाची संबंधितांनी कार्यवाही पूर्ण न केल्यास व विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहिल्यास याची संपूर्ण जबाबदारी संबंधित प्राचार्य, अध्यापक विद्यालय यांची राहील.

१०. शासकीय व व्यवस्थापन कोट्यातील डी.एल.एड. प्रवेशाबाबत वेळोवेळी दिल्या जाणा-या सूचना संकेतस्थळावर पाहून दिलेल्या सूचना प्रमाणे विहित मुदतीत कार्यवाही करणेबाबत आपल्या कार्यक्षेत्रातील सर्व अध्यापक विद्यालयांना सूचना द्याव्यात. याबाबत स्वतंत्र पत्रव्यवहार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**सोबत** : प्रवेश प्रक्रियेचे वेळापत्रक
(शासकीय व व्यवस्थापन कोटा)

(शरद गोसावी)
**संचालक**
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण
परिषद, महाराष्ट्र, पुणे

**प्रत - माहितीसाठी,**

१) मा. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई
२) मा. आयुक्त (शिक्षण) महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, पुणे
३) आयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे

**प्रत - कार्यवाहीसाठी,**

विभागीय शिक्षण उपसंचालक (सर्व)
आपल्या कार्यक्षेत्रातील सर्व अध्यापक विद्यालयांना सदरच्या सूचना द्याव्यात.

डी.एल.एड प्रथम वर्ष ऑनलाईन प्रवेशाचे वेळापत्रक सन २०२३-२४ (शासकीय कोटा)

| अ.क्र | कार्यवाहीचा तपशील | कालावधी |
|---|---|---|
| १. | उमेदवारानी ऑनलाईन आवेदनपत्र भरणे | दि.१३/०६/२०२३ ते २७/०६/२०२३ |
| २. | DIET स्तरावर पूर्ण भरलेल्या आवेदनपत्राची ऑनलाईन पडताळणी करणे. | १३/०६/२०२३ ते २८/०६/२०२३ |
| ३. | Objection cum merit list प्रसिद्ध करणे व आक्षेप निरसन | ०३/०७/२०२३ |
| ४. | पूर्ण भरलेल्या अर्जांची गुणवत्ता यादी संकेतस्थळावर प्रसिद्ध करणे. | दि.०५/०७/२०२३ |
| ५. | प्रथम फेरी प्रवेशाची यादी जाहीर करणे. | दि. ०६/०७/२०२३ |
| ६. | प्रथम फेरीतील उमेदवारानी प्रवेश घेणे. | दि.०६/०७/२०२३ ते १०/०७/२०२३ |
| ७. | प्रथम फेरीतील प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची यादी DIET कडे Loginवर पाठविणे. | दि.१०/०७/२०२३ |
| ७. | दुसऱ्या फेरीसाठी विकल्प देणे. (उमेदवारास बदल करावयाचा असल्यास) अन्यथा पूर्वी भरलेले विकल्प ग्राह्य धरले जातील. | दि.११/०७/२०२३ |
| ८. | दुसरी प्रवेश फेरी यादी जाहीर करणे. | १३/०७/२०२३ |
| ९. | दुसऱ्या प्रवेश फेरीतील उमेदवारानी प्रवेश घेणे. | दि.१३/०७/२०२३ ते १७/०७/२०२३ |
| १० | दुसऱ्या फेरीतील प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची यादी DIET कडे Login वर पाठविणे. | दि.१७/०७/२०२३ |
| ११. | तिसऱ्या फेरीसाठी विकल्प देणे. (उमेदवारास बदल करावयाचा असल्यास) अन्यथा पूर्वी भरलेले विकल्प ग्राह्य धरले जातील. | दि.१८/०७/२०२३ |
| १२. | तिसरी व अंतिम प्रवेश फेरी यादी जाहीर करणे. | दि.२०/०७/२०२३ |
| १३. | तिसऱ्या प्रवेश फेरीतील उमेदवारानी प्रवेश घेणे. | दि.२०/०७/२०२३ ते २४/०७/२०२३ |
| १४. | तिसऱ्या फेरीतील प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची यादी DIET कडे Login वर पाठविणे. | दि.२४/०७/२०२३ |
| १५. | प्रथम वर्ष सुरु दिनांक | दि.२०/०७/२०२३ |
| १६. | DIET प्राचार्यांनी जिल्ह्यातील अध्यापक विद्यालयनिहाय झालेल्या प्रवेशाची खात्री करून घेणे. | दि.२४/०७/२०२३ ते २६/०७/२०२३ |

सूचना - १. प्रत्येक प्रवेश फेरीतील यादी जाहीर झाल्यापासून उपरोक्त ठरवून दिलेल्या कालावधीत विद्यार्थ्यांनी प्रवेश घ्यावा.

२. उपरोक्त वेळापत्रक संभाव्य असून यामध्ये बदल करण्याचा अधिकार अध्यक्ष, राज्यस्तरीय डी.एल.एड प्रवेश निवड, निर्णय व प्रवेश संनियंत्रण समिती, पुणे यांना राहील.

(शरद गोसावी)
अध्यक्ष,
राज्यस्तरीय डी.एल.एड प्रवेश निवड,
निर्णय व प्रवेश संनियंत्रण समिती, पुणे

डी.एल.एड प्रथम वर्ष ऑनलाईन प्रवेशाचे वेळापत्रक सन २०२३ -२४ (व्यवस्थापन कोटा)

| अ.क्र | कार्यवाहीचा तपशील | कालावधी |
|---|---|---|
| १. | उमेदवारानी ऑनलाईन आवेदनपत्र भरणे | दि.१३/०६/२०२३ ते २७/०६/२०२३ |
| २. | संबंधित अध्यापक विद्यालयांनी व्यवस्थापन कोटयाची प्रवेशप्रक्रिया नियमावलीनुसार राबविणे. | दि.२८/०६/२०२३ ते १८/०७/२०२३ |
| ३. | अध्यापक विद्यालयांनी व्यवस्थापन कोटाप्रवेशाचे प्रस्ताव संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालक यांचेकडे ऑनलाईन सादर करणे.(Forward) | दि.२०/०७/२०२३ पर्यंत |
| ४. | विभागीय शिक्षण उपसंचालक यांनी ऑनलाईन प्राप्त प्रस्ताव तपासून त्यांचे Loginमधून प्रवेश Confirm करणे. | दि. २१/०७/२०२३ ते २४/०७/२०२३ |
| ५. | प्रथम वर्ष सुरु दिनांक | दि.२०/०७/२०२३ |

विहित कालावधीत संबंधितांनी कार्यवाही पूर्ण न केल्यास व विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहिल्यास याची संपूर्ण जबाबदारी संबंधित प्राचार्य, अध्यापक विद्यालय यांची राहील याची नोंद घ्यावी.

(शरद गोसावी)
अध्यक्ष,
राज्यस्तरीय डी.एल.एड प्रवेश निवड,
निर्णय व प्रवेश संनियंत्रण समिती, पुणे